# मेट्रो ३ प्रकल्पाचे ९६ टक्के भुयारीकरण पूर्ण

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेचे ९६ टक्के भुयारीकरण पूर्ण झाल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडकडून सांगण्यात आले आहे. पॅकेज १ अंतर्गत भुयारीकरणाचा ३८ वा टप्पा यशस्वीरित्या पार पडला असून, कफ परेड ते सीएसएमटी स्थानकापर्यंतच्या ऐतिहासिक वारसा इमारतीजवळील भुयारीकरण पूर्ण करण्यात आले आहे. यामुळे पॅकिज १ मधील भुयारीकरण १०० टक्के पूर्ण झाल्याची माहिती देण्यात आली आहे.

पॅकेज १ अंतर्गत भुयारीकरणाचा ३८ वा टप्पा पार केल्याने हुतात्मा चौक ते सीएसएमटी हा अपलाइन मार्गाचा ५५७ मीटर भुयारीकरणाचा टप्पा एकूण ४०५ रिंग्जच्या सहाय्याने १४९ दिवसांत पूर्ण झाला आहे. सूर्या १ या रॉबिन्स बनावटीच्या ड्युएल मोड हार्ड रॉक टनेल बोअरिंग मशीनने हे भुयारीकरण पूर्ण करण्यात आले आहे. मेट्रो ३ च्या एकूण ७ पैकी ६ पॅकिजचे १०० टक्के भुयारीकरण झाले आहे. ऐतिहासिक वारसा इमारतीनजीक भुयारीकरण करणे हे प्रकल्पातील अनेक आव्हानांपैकी एक होते.